बुलढाण्यात टक्कल व्हायरसचा धुमाकूळ; नागरिक भयभीत
>> पान 2

एका चुकीनं तुमचं पीएफ खातं रिकामं होऊ शकतं, EPFO कडून खातेदारांना इशारा
>> पान 3

महाराष्ट्रात स्वतंत्र आयुष मंत्रालय निर्माण करावे!
>> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



बॉक्स ऑफिसची क्वीन आहे, एकमेव भारतीय अभिनेत्री; केलीय १०,००० कोटींची कमाई
आतील पान

**सुविचार**

मोठेपणाने वागण्यासाठी अहंकाराला त्याग करावा लागतो.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 148 ■ गुरूवार, दि. 09 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# मराठी भाषेचा अभिजात दर्जाचं स्वप्न पूर्ण

## दिल्लीतून अखेर हवा असलेला शासन आदेश निघाला

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचं स्वप्न पूर्ण झालं असून दिल्लीतून अखेर मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासंदर्भातला शासन आदेश जारी करण्यात आलाय. सांस्कृतिक मंत्री गजेंद्र शेखावत यांनी मंत्री उदय सामंत यांना हा आदेश सोपवला असून हवा असलेला शासन आदेश निघाल्याने राज्यभर या आदेशाचे स्वागत केलं जातंय . त्याबाबतचा शासन आदेश जारी करण्यात आलाय.**

मराठी भाषा विभागाचे मंत्री उदय सामंत मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्यानंतर त्याचे अधिसूचना तात्काळ काढावी यासाठी दिल्लीला गेले होते. तिथून अभिजात मराठी भाषेच्या आदेशाची अधिसूचना केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र शेखावत यांनी आज उदय सामंत यांच्या हाती दिली. आज उदय सामंत यांनी केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांची सदानंद मोरे आणि ज्ञानेश्वर मुळेंसोबत भेट घेतली. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याची घोषणा झाली असली तरी अधिसूचना न निघाल्याने त्यासंदर्भात ही बैठक होती.

२००४ साली जेव्हा नियम तयार केले गेले, तेव्हा त्या भाषेतील ग्रंथांची पुरातनता आणि हजार वर्षाच्या इतिहासाची नोंद असणं गरजेचं होतं. प्राचीन साहित्यग्रंथांचा एक भाग, ज्याला वक्त्यांच्या पिढ्यांकडून मौल्यवान वारसा म्हणून गणलं जाते. त्याचबरोबर साहित्यिक परंपरा मूळ असली पाहीजे आणि दुसऱ्या भाषेतून घेतलेली नसावी. या निकषावर तामिळ ही भाषा अभिजात भाषा म्हणून ग्राह्य धरली गेली.

नोव्हेंबर २००५ मध्ये अभिजात भाषेच्या निकषात सुधारणा करण्यात आली आणि संस्कृतला हा दर्जा मिळाला होता. अभिजात भाषा ठरवण्यासाठी त्या भाषेचा इतिहास हा दीड ते दोन हजार वर्षे जुना असणं गरजेचं आहे. प्राचीन साहित्यग्रंथांचा एक भाग, ज्याला वक्त्यांच्या पिढ्यांकडून मौल्यवान वारसा म्हणून गणलं जाते. दुसऱ्या भाषेतून सदर भाषा उसनी घेतलेली नसावी. तसेच त्याची एक स्वतंत्र साहित्य परंपरा असावी.प्राचीन भाषा आणि आधुनिक भाषेत फरक असणं गरजेचं आहे.



मराठी भाषेला अभिजात भाषेचा मान मिळाल्याबाबतची अधिसूचना आज केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्याकडे सुपूर्त केली

# आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून महसूल वाढविण्यावर भर द्यावा- मुख्यमंत्री फडणवीस

## पुढील १०० दिवसांमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने करावयाच्या कामाचा घेतला आढावा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** : राज्य उत्पादन शुल्क विभाग हा शासनाला महसूल मिळवून देणारा महत्वाचा विभाग आहे. महसूल वाढविण्यासाठी विभागाने नवनवीन संकल्पना अंमलात आणून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने महसूल वाढवण्यावर भर द्यावा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी आढावा घेतला.

या बैठकीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची प्रमुख उपस्थित होती.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, या विभागातील सेवा हमी कायद्यांतर्गत सुचित केलेल्या १३४ सेवा पैकी ६२ सेवा कार्यान्वित असून उर्वरित ७२ सेवा ऑनलाइन करण्यात येणार आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विविध कार्यप्रणालीमध्ये अत्याधुनिक साधनसामुग्रीचा वापर करण्यात यावा. मद्यार्क वाहतूक करणाऱ्या वाहनावर डिजिटल लॉक बसविण्याची कार्यवाही करावी. तसेच गुन्हेगारांना वचक बसावा या पद्धतीने कार्यप्रणाली आखण्यात यावी. अवैधरित्या मद्य निर्मिती, वाहतूक व विक्रीला आळा घालण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

याप्रसंगी अपर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी.गुप्ता, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्रि्वनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी आदी उपस्थित होते.

# शेअर मार्केट कोसळलं, बँकिंग शेअर्स आपटले, गुंतवणूकदारांचं मोठं नुकसान

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** शेअर मार्केटमध्ये सोमवार नंतर पुन्हा एकदा हादरा बसला आहे. गुंतवणूकदारांचं टेन्शन वाढलं आहे. बँकिंग सेक्टरला याचा खूप मोठा फटका बसला आहे. शेअर बाजारात पुन्हा एकदा मोठी घसरण झाली आहे. बुधवारी, आठवड्याच्या तिसऱ्या दिवशी दुसऱ्या सत्रात सेन्सेक्स ६०० हून अधिक अंकांनी घसरला.



नॅशनल स्टॉक एक्सचेंज निफ्टी १७० अंकांनी घसरला. बाजारातील या घसरणीदरम्यान, अदानी पोर्ट्स, टायटन, झोमॅटो शेअर्समध्ये घसरण दिसून आली. सेन्सेक्समध्ये ६३० अंकांची मोठी घसरण बुधवारी शेअर बाजारात पुन्हा एकदा झाली. दुपारी १२ वाजेपर्यत सेन्सेक्स आणि निफ्टी हे दोन्ही निर्देशांक कोसळले.

बुधवारी शेअर बाजारात अचानक झालेल्या या मोठ्या घसरणीत अदानीपासून टाटापर्यंतचे शेअर्स कोसळले. लार्ज कॅप कंपन्यांमध्ये गौतम अदानी यांची कंपनी अदानी पोर्ट्स सर्वाधिक घसरलेल्या १० समभागांमध्ये होती. अदानी पोर्ट्स शेअर २.७६म च्या घसरणीसह व्यापार करत होता तर टाटा समूह कंपनी टायटनचा शेअर देखील ३म च्या घसरणीसह व्यापर करत होते.

NTPC, Tata Motors, Infosys, ICICI Bank, HCL Tech, BHEL, Tata ElXsi, Aarti Industries, Biocon, GoDigit, Voltas, Lupin, Policy Bazar, या शेअर्सम ध्ये मोठी घसरण पाहायला मिळाली. त्यामुळे गुंतवणूकदारांचं टेन्शन वाढलं असून आता येत्या काळात पैसे ठेवावेत की काढावेत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.



मुंबईत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची छात्र संसदेच्या विद्यार्थ्यांनी भेट घेतली

# अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळी तुरुंगातून बाहेर येणार,२८ दिवसांचा फर्लो मंजूर

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गँगस्टर अरुण गवळी याला २८ दिवसाची संचित रजा मंजूर केली आहे. काल (मंगळवारी) मुंबईतील कुख्यात डॉन अरुण गवळीला २८ दिवसांची संचित रजा मंजूर करण्यात आली आहे. न्यायमूर्ती नितीन सांबरे व वृषाली जोशी यांनी याबाबतचा निर्णय दिला आहे. याआधी अरुण गवळी याला कारागृह उपमहानिरीक्षक यांच्याकडे संचित रजेसाठी अर्ज केला होता तो नामंजूर केल्याने अरुण गवळी याने नायायालयात धाव घेतली होती.


गेल्या वर्षी १८ ऑगस्ट २०२४ रोजी अरुण गवळीने केलेला अर्ज

कुख्यात अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २८ दिवसांची संचित रजा म्हणजे फर्लो मंजूर केली आहे. गेल्या वर्षी १८ ऑगस्ट २०२४ रोजी अरुण गवळीने नागपूरच्या कारागृह महानिरीक्षक यांच्याकडे संचित रजेसाठी अर्ज केला होता. मात्र अरुण गवळीचा गुन्हेगारी जगतावरील प्रभाव पाहता आणि तो एकेकाळी गुन्हेगारी टोळीचा मोहरक्या असल्याचे कारण देत विधानसभा निवडणुकांच्या काळात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशी शक्यता लक्षात घेऊन कारागृह महानिरीक्षकांनी तो अर्ज फेटाळला होता.

**गवळीच्या वकिलांचा युक्तीवाद काय?**

कारागृह महानिरीक्षकांच्या त्याच निर्णयाच्या विरोधात अरुण गवळीने आपल्या वकिलांच्या म ाध्यमातून नागपूर खंडपीठांमध्ये याचिका दाखल केली होती. त्याच्या याचिकेसंदर्भात नागपूर खंडपीठाने निर्णय घेत अरुण गवळीला २८ दिवसांची संचित रजा मंजूर केली आहे. या सुनावणीवेळी, गवळीचे वकील ॲड. मीर नगमान अली यांनी कारागृह उपमहानिरीक्षकांचा निर्णय अवैध असल्याचा दावा करत संचित रजा मिळावी अशी मागणी केली, यापूर्वी रजेवर सुटल्यानंतर गवळीने प्रत्येकवेळी कायदे व नियम ांचे काटेकोर पालन केलेले आहे. परिणामी, यावेळीही रजा नाकारता येणार नाही, असे गवळीच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले आहे.

नागपूर खंडपीठाने विविध बाबी लक्षात घेवून गवळीची याचिका मंजूर करून कारागृह उपमहानिरीक्षकांचा वादग्रस्त आदेश रद्द केला. त्याचबरोबर, अरूण गवळीचा रजा मंजूर केली आहे. अरूण गवळीला शिवसेनेचे नगरसेवक कमलाकर जामसंडेकर यांच्या खून प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. तो नागपूर मध्यवर्ती कारागृहात शिक्षा



भोगत आहे. ही घटना २००७ मध्ये घडली होती. अरुण गवळीसह इतर ११ जणांना २०१२ मध्ये जन्म ठेपेची शिक्षा झाली आहे.

**फर्लो आणि पॅरोलमध्ये काय फरक आहे?**

पॅरोल म्हणजे तुरुंगातून सूट. ही सूट तुरुंगात असलेल्या आणि शिक्षा भोगलेल्या कैद्याला मिळू शकते. पॅरोल मंजूर करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे आणि प्रत्येक राज्यात त्याचे नियम वेगळे आहेत. कैद्याला त्याच्या वागणुकीच्या आणि शिक्षा भोगण्याच्या पद्धतीच्या आधारावर पॅरोलची सुविधा दिली जाते. याद्वारे तो सामाजिक संबंध सुधारू शकतो आणि काही म हत्त्वाची कामे पूर्ण करू शकतो.

फर्लो म्हणजे ही एक सूट आहे, जी तुरुंगातील कैद्याला स्वातंर्त्याच्या रूपात मिळते. काही काळ तुरुंगात राहून शिक्षा भोगलेल्या कैद्याचा हा अधिकार मानला जातो. सरकार किंवा तुरुंग अधिकारी कौटुंबिक अनुभव, कैद्यांचे वर्तन आणि तुरुंगातील अहवालांच्या आधारे फर्लो मंजूर किंवा नामंजूर करू शकतात. या सूटमुळे कैद्याला त्याच्या कुटुंबीयांना भेटण्याची आणि सामाजिक संबंध सुधारण्याची संधी मिळते.

# अलिबागच्या समुद्रात मच्छीमार बोट बुडाली; १५ खलाशांना वाचवण्यात यश

**दैनिक आपला विदर्भ**

**अलिबाग/प्रतिनिधी :** येथील सम ुद्रात आक्षी साखर भागात 'हिरकन्या' ही मच्छीमारी बोट सोसाट्याच्या वाऱ्याम ुळे बुडाल्याची घटना घडली. सुदैवाने बोटीवरील सर्व खलाशी बचावले असले तरी बोट बुडाल्याने तब्बल २० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा बोट मालक जगदीश बामजी यांनी केला आहे. दुसऱ्या मच्छीमारी बोटीतील खलाशांनी वेळीच प्रसंगावधान राखून मदत केल्याने १५ खलाशांचा जीव वाचला आहे.

जगदीश बामजी यांच्या मालकीची हिरकन्या बोट १५ खलाशांसह मासेम ारीसाठी निघाली होती. हिरकन्या'मधील खलाशी हे मासेमारी करताना थकून बोटीतच झोपले होते. त्याचवेळी जोरदार वाऱ्यामुळे बोट भरकटली. त्यानंतर काही काळाने बोटीत पाणी भरू लागले. कुलाबा किल्ल्याच्या मागील बाजूस बोट अचानक बुडू लागली. ही घटना समोरून येणाऱ्या बोट चालकाच्या लक्षात येताच, त्याने आरडाओरडा करून हिरकन्याम धील खलाशांना जागे केले. त्यानंतर त्यांना बोटीत घेतले. मात्र, हिरकन्या बोट बुडाली.

मिळालेल्या माहितीनुसार हिरकन्या बोट बुडाल्याचे कळताच बोट म ालक जगदीश बामजी दुसऱ्या बोटीने घटनास्थळी पोहोचले. मत्स्यव्यवसाय विकास विभागाचे अधिकारी कर्मचारी अलिबाग किनारी पोहोचले असून ते बोटीला झालेल्या अपघाताची माहिती घेत आहेत. अथक परिश्रमानंतर स्थानिकांच्या मदतीने अपघातग्रस्त बोट बाहेर काढण्यात मच्छीमारांना यश आले.

## जीवघेणा नायलॉन मांजा

जानेवारी महिना उजाडला की सर्वांना वेध लागतात ते मकर संक्रांत या सणाचे. मकर संक्रांत हा हिंदू धर्मातील सर्वात महत्वाचा सण मानला जातो. मकर संक्रांतीनिमित्त पंतगोत्सव साजरा करण्याची आपल्याकडे खूप जुनी परंपरा आहे. रंगीबेरंगी पतंग आकाशात उडवून हा उत्सव साजरा केला जातो. लहानांपासून मोठयांपर्यंत सर्वचजण पतंग उडविण्याचा आनंद यानिमित्ताने लुटत असतात पण अलीकडे हा खेळ जीवघेणा ठरत आहे. पतंग उडविण्यासाठी पूर्वी साधा सुती दोरा वापरला जात होता मात्र काही वर्षांपासून पतंग उडविण्यासाठी चिनी किंवा नायलॉन मांजाचा वापर केला जातो आणि हाच नायलॉन मांजा आता जीवघेणा ठरत आहे. मागील आठवड्यात पुण्यातील वारजे, धनकवडी आणि कात्रज – कोंडवा परिसरात दुचाकी वरून जाणाऱ्या व्यक्तींच्या गळ्याला नायलॉन मांजा कापल्याने दुखापत झाल्याची घटना घडल्या. केवळ नशीब बलवत्तर होते म्हणून त्यांचा जीव वाचला अर्थात सर्वांचेच नशीब बलवत्तर असते असे नाही. मागील वर्षी दुचाकीवरून जाताना नायलॉन मांजाने गळा चिरून पोलीस हवालदाराचा मृत्यू झाल्याची बातमी नुकतीच वाचण्यात आली होती. अर्थात नायलॉन मांजाने गळा चिरून निष्पाप नागरिकाचा मृत्यू झाल्याची टी पहिलीच बातमी नव्हती दरवर्षी अशा बातम्या वर्तमानपत्रात वाचायला मिळतात. दौंडमध्येही दोन वर्षी अशाच प्रकारे एका दुचाकी स्वाराचा बळी गेला होता. तीन वर्षापूर्वी पुण्यात एका तरुणीला ही अशाच प्रकारे दुर्दैवी मृत्यू आला होता. केवळ पुण्यात नाही तर नाशिकमध्येही अशीच घटना घडली होती त्यातही एका महिलेचा नायलॉन मांजाने गळा चिरून दुर्दैवी मृत्यू झाला होता. अर्थात हे प्रातिनिधिक उदाहरणे आहेत अशाप्रकारे नायलॉन माजांने राज्यात अनेक निष्पापांना आपला जीव गमवावा लागला आहे. या मांजामध्ये अडकून आकाशात मुक्तविहार करणारे पक्षीही जखमी होतात काही पक्षी मृत्यू पावतात. चिनी बनावटीचा हा मांजा नायलॉन धागा, काचेचा चुरा, लोखंडाचे कण आणि रासायनिक पदार्थांपासून बनवला जातो. हा मांजा माणसांसोबत पक्षी आणि प्राण्यांसाठी देखील घातक आहे. वास्तविक नायलॉन मांजाचा खरेदी विक्रीवर बंदी घालण्याचे आणि वापराबाबत प्रतिबंधात्मक उपायोजना करण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत. मांजामुळे पशूपक्षांना होणाऱ्या दुखापतीच्या संदर्भात पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालयाने राज्य सरकारला पत्र पाठवले होते. नायलॉन मांजामुळे वन्यजीव ( संरक्षण ) अधिनियम १९७२ च्या अनुसूचितील वन्यप्राणी व पक्षांचा मृत्यू झाल्यास किंवा त्यांना दुखापत झाल्यास वन कायद्याच्या कलम ९ नुसार कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते त्यामुळे नायलॉन मांजाच्या विक्रीवर महाराष्ट्र सरकारने बंदी घातलेली असतानाही हा मांजा दुकानात सर्रास विकला जात आहे तरीही विक्रेत्यांवर कारवाई होताना दिसत नाही. काही ठिकाणी प्रशासनाने कारवाई केल्याच्या बातम्या आल्या ही समाधनाची बाब असली तरी कारवाईत सातत्य नाही. जो मांजा दुकानात विकण्यासाठी येतो तोच मांजा प्रशासनाला कसा मिळत नाही? आणखी किती बळी गेल्यावर प्रशासनाला जाग येणार आहे ? प्रशासनाने नायलॉन मांजा विरोधात धडक मोहीम राबवायला हवी. नायलॉन मांजा विकणारा आणि खरेदी करणारा अशा दोघांवरही कारवाई व्हायला हवी. नागरिकांनीही नायलॉन मांजाने पतंग उडविण्याऐवजी साध्या सुती दोरीचा वापर करून पतंग उडवावी आणि हा सण साजरा करावा.

# बुलढाण्यात टक्कल व्हायरसचा धुमाकूळ; नागरिक भयभीत

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बुलढाणा :** शेगाव् तालुक्यात काही गावामधे नागरिकांना केसगळतीची समस्या जाणवत असून चक्क टक्कल पडत असल्याने नागरिक भयभीत झाले आहेत. तालुक्यातील बोंडगाव, कालवड, हिंगणा या गावात अज्ञात व्हायरस ने थैमान घातले असून, कुटुंब ची कुटुंब या व्हायरस चा बळी ठरत आहेत अगोदर डोके खाजवणे, नंतर सरळ केस हाती येणे आणि तिसऱ्या दिवशी चक्क टक्कल पडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, यास तिन्ही गावातील शेकडो नागरिकांची केस गेली असून महिलांची संख्याही लक्षणीय आहे मात्र एवढ्या भांकर प्रकार होऊनही आरोग्य विभाग अनभिज्ञ आहे, त्यामुळे नागरिक खाजगीत उपचार घेत आहेत. शाम्पू ने असा प्रकार घडत असावा असे डॉक्टरांचे मत असले तरी कधीही आयुष्यात शाम्पू न वापरणाऱ्या नागरिकांचेही केस जात असल्याने






नागरिकांमध्ये खळबळ निर्माण झाली आहे जिल्हा आरोग्य अधिकारी यांना शेगाव तालुका शिवसेनाप्रमुख रामेश्र्वर थारकर यांनी निवेदन देऊन या गंभीर बाबीची दखल घेऊन त्वरित सदर गावांमध्ये उपचार शिबिरे राबवण्याचे आवाहन केले आहे.

या गावामधे आरोग्य विभागाने कोणतीही ठोस उपाय योजना केली नव्हती.. कालवड, बोंडगाव व हिंगणा या गावामधे केस गळतीची समस्या नागरिकांना जाणवत असून आपोआप टक्कल पडत आहेत याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ गीते यांना निवेदन दिले आहे.

# धक्कादायक! शाळेत शिकवणी सूरू असताना जमिनीवर कोसळली, हार्ट अटॅकने शाळकरी मुलीचा मृत्यू

म्हैसूर : देशभरात हार्ट अटॅकच्या घटना वाढत चालल्या आहेत. काही वर्षापुर्वी पन्नाशी ते साठी गाठलेल्या लोकांना हार्ट अटॅकचा धोका असायचा. मात्र गेल्या काही वर्षापासून हार्ट अटॅकचे रूग्ण हे वयाच्या तिशीतही सापडत आहेत. इतकंच नाही तर लहान लहानपोरांना देखील हार्ट अटॅक येत आहेत. आता या घटनेत एका शाळकरी मुलीला हार्ट अटॅक आल्याची घटना घडली आहे. या घटनेत मुलीचा दुदैवी मृत्यू झाला आहे. या घटनेने मुलीच्या कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.



कर्नाटकच्या म्हैसूरमध्ये ही घटना घडली आहे. म्हैसूरमध्ये खाजगी शाळेत शिकत असणाऱ्या एका मुलीला हार्ट अटॅक आला होता. या हार्ट अटॅकच्या झटक्यात मुलीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मुलीच्या या अकस्मात मत्यूने कुटुंबियांना मोठा हादरा बसला आहे. तर परिसरात हळहळ व्यक्त होतं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडीत मुलगी ही एका खाजगी शाळेत शिकत होती. या दरम्यान शाळेत शिकवणी घेत असताना अचानक ती जमीनीवर कोसळली. जमिनीवर कोसळल्यानंतर तिला तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र, रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. डॉक्टरांनी तिचा मृत्यू कमी रक्तदाब किंवा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचा शंका व्यक्त केली आहे.त्यामुळे या घटनेने कुटुंबियांना मोठा धक्का बसला आहे.तर परिसरात हळहळ व्यक्त होतं आहे.

# पत्नीच्या छळामुळे तरुणाची आत्महत्या, पत्नी,सासूसह मेहुणी विरुद्ध गुन्हा दाखल

**पुणे/प्रतिनिधी :** पत्नी, सासू आणि मेहुणीने दिलेल्या त्रासामुळे तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना विश्रांतवाडी भागात घडली. तरुणाला आत्महत्येस केल्याच्या आरोपावरुन पत्नी, सासू, मेहुणीविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

प्रफुल्ल हरिश्चंद्र कदम (वय ३२, रा. सत्यम राजयोग सोसायटी, धानोरी, विश्रांतवाडी) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत कदम यांचे वडील हरिश्चंद्र गोविंद कदम (वय ६०) यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, प्रफुल्ल याची पत्नी, सासू, मेहुणी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रफुल्ल यांची सासू आणि मेहुणी चिंचवडमधील छत्रपती संभाजीनगर भागात राहायला आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,विवाहानंतर पत्नी, सासू, मेहुणीने प्रफुल्ल यांना त्रास देण्यास सुरुवात केली. 'तुम्ही आम्हाला फसवले आहे. तू मेला तर मी दुसरा विवाह करुन सुखी राहिल', असे त्यांनी प्रफुल्ल यांना सांगितले होते. पत्नी, सासू, मेहुणीच्या टोमण्यांमुळे त्यांनी ३१ डिसेंबर रोजी धानोरीतील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी प्रफुल्ल यांनी चिठ्ठी लिहिली होती. चिठ्ठीत पत्नी, सासू, मेहुणीच्या त्रासामुळे आत्महत्या करत असल्याचे प्रफुल्ल यांनी नमूद केले होते. त्यांचे वडील हरिश्चंद्र यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक पद्मराज गंपले तपास करत आहेत.

# बीड शहर पोलीस मुख्यालयातील पोलीस कर्मचाऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या, चर्चांना उधाण

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून चर्चेच्या केंद्रस्थानी असलेल्या बीड जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. बीड शहरातील पोलीस मुख्यालयात कर्तव्यावर असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याने मुख्यालयाच्या भिंतीलगत आवळ्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली. बुधवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. अनंत मारोती इंगळे (रा. कळंमआंबा ता.केज जि बीड) असे आत्महत्या केलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. दरम्यान पोलीस कर्मचारी अनंत इंगळे यांनी आत्महत्या का केली ? हे अद्याप अस्पष्ट असून या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणामुळे बीड जिल्हा सध्या चर्चेत आहे. या हत्याप्रकरणाच्या तपासासाठी सध्या सीआयडी आणि विशेष तपास पथकाचे (एसआयटी) अधिकारी सध्या बीड शहरात तळ ठोकून आहेत. बीड शहर पोलीस ठाणे हे सध्या संतोष देशमुख हत्याप्रकरणाचे केंद्रस्थान आहे. याच पोलीस ठाण्यात आरोपी वाल्मिक कराड यांना ठेवण्यात आले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर पोलीस कर्मचारी अनंत इंगळे यांनी आत्महत्या केल्याने चर्चांना उधाण आले आहे. याप्रकरणात आता पोलीस पुढे काय तपास करणार, हे पाहावे लागेल. अनंत इंगळे यांच्यावर नेमका कोणता दबाव होता की त्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले, हा प्रश्न अनेकांना पडला आहे. त्यामुळे आता पोलीस तपासातून काय समोर येणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

संतोष देशमुख हत्याप्रकरणातील आरोप सुदर्शन घुले आणि सांगळे यांना शोधून काढण्यात ज्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली होती, त्या वायबसे दाम्पत्याची सीआयडीकडून पुन्हा चौकशी केली जाणार आहे. संतोष देशमुख हत्याप्रकरणी पुन्हा संभाजी वायबसे व सुरेखा वायबसे या दोघांची सीआयडीकडून चौकशी होणार आहे. यापूर्वीच संभाजी वायबसे आणि सुरेखाबाई वायभसे यांची सीआयडीने चौकशी केली होती, मात्र त्यांना नोटीस देऊन सोडण्यात आले होते. या हत्या प्रकरणातील एकमेव फरार आरोपी कृष्णा आंधळे हा अद्याप फरार आहे. त्याच्या तपासासंदर्भात वायबसे दाम्पत्याची चौकशी होऊ शकते, असा अंदाज वर्तविला जात आहे.

## पोलिसांचे वाल्मिक कराडशी लागेबांधे असल्याचा आरोप

बीड जिल्ह्यातील अनेक पोलिसांचे वाल्मिक कराड याच्याशी लागेबांधे असल्याची माहिती समोर आली होती. वाल्मिक कराड आणि काही पोलीस कर्मचाऱ्यांचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. या पोलीस कर्मचाऱ्यांचा संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या तपासासाठी गठित करण्यात आलेल्या एसआयटीत समावेश होता. आरोप झाल्यानंतर या पोलीस कर्मचाऱ्यांना एसआयटीतून काढण्यात आले होते.

# कोल्हापूर हादरलं! मामानेच भाचीच्या लग्नाच्या रिसेप्शनमध्ये जेवणात टाकलं विषारी औषध

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** प्रेमात आणि युद्धात सारं काही माफ असतं असं म्हटलं जातं. मात्र कोल्हापूरमध्ये प्रेम करुन लग्न करण्याची मोठी शिक्षा लग्न मंडपात उभ्या असलेल्या एका मुलीच्या कुटुंबाबरोबरच लग्नाला आलेल्या सर्वांना भोगावी लागली असती. सुदैवाने हा सारा प्रकार वेळीच लक्षात आल्याने मोठा अनर्थ टळला आहे. या प्रकरणामधील मुख्य आरोपी हा नवरीचा मामाच असून पोलीस सध्या त्याच्या मागावर आहेत.

नेमका कुठे घडला हा सारा प्रकार?

कोल्हापूरमधील पन्हाळा तालुक्यातील उत्रे गावामध्ये भाचीच्या लग्नाच्या स्वागत समारंभासाठी आयोजित करण्यात आलेल्या भोजनाच्या कार्यक्रमातीव जेवणात मामानेच विषारी औषध टाकल्याची घटना समोर आली आहे. ही माहिती समोर आल्यानंतर गावात एकच खळबळ उडाली आहे. या आरोपीचं नाव महेश जोतीराम पाटील असं आहे. आरोपीने आपल्या भाचीच्या लग्नाच्या जेवणात विष का टाकलं याचं धक्कादायक कारण समोर आलं आहे

महेश या आरोपीचा भाचीच्या लग्नाला विरोध होता. आपल्या मर्जी विरोधात भाचीने लग्न केल्याचं महेशला आवडलं नव्हतं. मात्र आठवड्यापूर्वीच भाचीने गावातीलच मुलासोबत पळून जाऊन लग्न केल्याने बदनामीच्या रागातून महेशने हे कृत्य केल्याची माहिती समोर आली आहे. पळून जाऊन लग्न केलेल्या या मुलीच्या घरच्यांनी तिचं हे लग्न स्वीकारलं. या दोघांचा स्वीकार केल्यानंतर लग्नाच्या आठवडाभरानंतर घरच्यांनी गावकऱ्यांसाठी भोजन समारंभाचं आयोजन केलं होतं. मात्र या भोजन समारंभामधील जेवणात मुलीवरील राग काढण्यासाठी महेशने विषारी औषध टाकलं.

या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून आरोपी महेशचा शोध सुरु केला आहे. लग्नाच्या रिसेप्शननिमित्त आयोजित भोजन समारंभातील जेवणात विषारी औषढ टाकताना महेशला आचाऱ्याने पाहिल्याने त्याचा भांडाफोड झाला. त्यानंतर महेशने तिथून पळ काढला असून तो फरार आहे. आचाऱ्याने वेळीच हा सारा प्रकार पाहिल्याने एक मोठा अनर्थ टळला.







DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# एका चुकीनं तुमचं पीएफ खातं रिकामं होऊ शकतं, EPFO कडून खातेदारांना इशारा

## तोतया अधिकाऱ्यांपासून सावध राहण्याच्या सूचना

नवी दिल्ली : जर तुम्ही सरकारी किंवा खासगी क्षेत्रात नोकरी करत असाल तर तुमच्या पगारातील ठराविक रक्कम पीएफ खात्यात जमा केली जाते. कर्मचारी भविष्य निधी संघटना म्हणजेच ईपीएफओनं कोट्यवधी खातेधारकांना एक सूचना वजा इशारा दिला आहे. सायबर फ्रॉडपासून वाचण्यासाठी इशारा देण्यात आला आहे. ईपीएफओनं खातेदार असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या खात्यासंदर्भातील माहिती कोणत्याही व्यक्तीसोबत शेअर करु नये, असा सल्ला दिला आहे. ईपीएफओनं त्यांच्या अधिकृत सोशल मिडिया अकाऊंटवरुन हे माहिती दिली आहे.

ईपीएफओनं अधिकृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करुन काही बाबी स्पष्ट केल्या. यामध्ये ईपीएफओकडून सांगण्यात आलं की खातेदारांची कोणतीही माहिती




मागितली जात नाही. कोणताही व्यक्ती ईपीएफओचा कर्मचारी अथवा अधिकारी असल्याचं सांगत फोन नंबर, ईमेल, मेसेज किंवा व्हाटसअपद्वारे यूएएन, पासवर्ड,पॅन नंबर, आधार क्रमांक, बँक खाते किंवा ओटीपी मागत असेल तर ती माहिती देऊ नका, असं सांगण्यात आलं आहे.

सायबर गुन्हेगार स्वत:ला ईपीएफओचे अधिकारी असल्याचं सांगून कर्मचाऱ्यांची फसवणूक करण्याचा प्रयत्न करु शकतात. हे गुन्हेगार गोपनीय माहितीचा दुरुपयोग देखील करु शकतात. गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पीएफ खात्यातील रक्कम देखील काढू शकतात, त्यामुळं खातेदारांनी फसवणूक टाळण्यासाठी सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

तक्रार दाखल करण्याचं आवाहन

जर कोणताही व्यक्ती ईपीएफओच्या नावानं तुमच्याकडून गोपनीय माहिती मागत असेल सतर्क होत तक्रार दाखल करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. सायबर कॅफे किंवा सार्वजनिक डिव्हाईसवर तुम्ही ईपीएफओ खात्यात लॉगीन करु नये, असा सल्ला देखील देण्यात आला आहे.

ईपीएफओनं खातेदारांना वैयक्तिक लॅपटॉप, कॉम्प्युटर, टॅबलेट किंवा मोबाइल फोनचा वापर करण्याचा सल्ला दिला आहे. यामुळं तुमची माहिती सुरक्षित राहू शकते. फसवणूक होण्याची शक्यता देखील कमी होते.

ईपीएफओनं त्यांची वेबसाईट अपडेट देखील केली आहे. सोशल मीडियाद्वारे खातेदारांना देखील जागरुक केलं जात आहे. सायबर गुन्हेगारांपासून खातेदारांची फसवणूक होऊ नये, यासासाठी खबरदारी घेण्याचं आवाहनं ईपीएफओ करण्यात आलं आहे.

गेल्या काही वर्षापासून सायबर गुन्हेगारीच्या घटना वाढलेल्या आहेत. खातेधारकांनी त्यांच्या खात्यांची गोपनीयता काम राखणं आवश्यक आहे. अनोळखी व्यक्तीसोबत किंवा दुसऱ्या व्यक्तीसोबत तुमच्या खात्याचे महत्त्वाचे तपशील शेअर करणं टाळल्यास फसवणूक टाळता येऊ शकते.

## लोकलने विनातिकीट प्रवास करणाऱ्यांना दंडावरही भरावा लागणार GST; दंडाची रक्कम एकदा पाहाच



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** रेल्वे प्रशासनाने विनातिकिट प्रवास करणाऱ्या नागरिकांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. लवकरच रेल्वे प्रशासनाकडून दंडाची रक्कम वाढवण्यात येण्याची शक्यता आहे. पश्चिम आणि मध्य रेल्वेकडून तसा प्रस्ताव रेल्वे प्रशासनाला दिला आहे. त्यामुळं येत्या काळात लोकलमधून फुकट प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून दंडाची अधिक रक्कम वसूल करण्यात येऊ शकते.

रेल्वे प्रशासनाकडून लोकलमध्ये विनतिकिट प्रवास करणाऱ्या प्रवाशांविरोधात विशेष मोहिम राबवण्यात येते. दररोज हजारो प्रवासी विनातिकिट प्रवास करतात. त्यांच्याकडून वसुल करण्यात आलेल्या दंडाची रक्कमदेखील जास्त असते. या दंडाच्या रकमेतून रेल्वेला चांगला महसूलदेखील मिळतो. मात्र, या फुकट्या प्रवाशांना चाप बसावा यासाठी रेल्वेने आता कारवाई अधिक कठोर करण्याचा विचार केला आहे. सध्या रेल्वेकडून फुकट्या प्रवाशांकडून २५० रुपये दंड आकारण्यात येतो. मात्र लवकरच या दंडाच्या रकमेत वाढ होण्याची शक्यता आहे.

रेल्वे सध्या प्रवाशांकडून आकारत असलेल्या दंडाची रक्कम २५० रुपये आहे. सेकंड क्लास, फर्स्ट क्लास आणि एसी कोचसाठीही हिच रक्कम आकारली जाते. मात्र रेल्वे प्रशासनाला दिलेल्या प्रस्तावानुसार, सेकंड क्लाससाठी २५० रुपये, फर्स्ट क्लाससाठी ७५० रुपये आणि एसी लोकलसाठी १ हजार रुपयांचा दंड आकारण्यात यावा असं नमूद केलं आहे. तसंच, लंबा पल्ल्याच्या ट्रेनसाठी जितका दंड आकारला जातो त्यावर अतिरिक्त ५ टक्के जीएसटीदेखील आकारण्यात यावा, असंदेखील प्रस्तावात म्हणण्यात आलं आहे.

फर्स्ट क्लास आणि एसी कोचमधून विनातिकिट प्रवास करणाऱ्यांकडून २५० रुपये, तिकिटाचे पैसे आणि अतिरिक्त जीएसटीदेखील आकारण्यात येईल. रेल्वेच्या नव्या प्रस्तावात विविध श्रेणीनुसार दंड आकारण्याची शिफारस केली आहे. हा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. मंजुरी मिळाल्यानंतरच हा नियम लागू होणार आहे.

विनातिकिट प्रवास करणाऱ्या नागरिकांची संख्या वाढत असल्याने रेल्वेने हा निर्णय घेतला आहे. रेल्वे अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे की, लांब पल्ल्याच्या ट्रेनसाठी सध्या दंड आकारण्याची प्रक्रिया आधीपासूनचे वेगवेगळी आहे. ३अण, २अण आणि १ अण कोचसाठी वेगवेगळे दंड आकारण्यात येत आहे. यात दंडाची रक्कम, तिकिटाची रक्कम आणि जीएसटीदेखील आकारण्यात येते.

## मजा मस्तीत मुलगा दोन वर्षाच्या मुलीवर पडला, जागेवरच मृत्यू, मुंबईत हादरवणारी घटना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** मुंबईमध्ये जुहू परिसरात एक मुलगा दोन वर्षाच्या मुलीवर तोल गेल्याने पडला. मात्र, या घटनेमध्ये त्या दोन वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. मुंबईतील जुहू परिसरात एक मुलगा तोल गेल्याने दोन वर्षाच्या मुलीच्या अंगावरती पडला मुलीच्या मृत्यूप्रकरणी निष्काळजीपणाचा आरोप करत कुटुंबीयांनी जुहू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मुंबईतील जुहू परिसरात ही घटना घडली असून, कॉलेजमध्ये शिकणाऱ्या एका मुलाचा तोल गेल्याने दोन वर्षाच्या मुलीवर पडला, त्यामुळे दोन वर्षाच्या चिमुकल्या मुलीचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, २ जानेवारी रोजी विधी अग्रहरी नावाची मुलगी तिच्या कुटुंबीयांच्या दुकानाजवळ खेळत असताना ही घटना घडली. मुलीचे वडील विनय अग्रहरी यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार,आरोपी हर्षद गौरव त्यावेळी त्याच्या मित्रांसोबत मस्ती करत होता. त्याचा मित्र शाहनवाज अन्सारीही त्याच्यासोबत होता, मुलीच्या आईने त्यांना इथे खेळू नका आणि दुसरीकडे जा असं सांगितलं होतं. पण ते तिथेच थांबले.

दोघेही मस्ती करत होते, मस्करी करत होते, यादरम्यान हर्षदचा तोल गेला आणि तो त्या चिमुकल्या मुलीच्या अंगावर पडला. त्यामुळे मुलीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि कुटुंबीयांनी तिला तातडीने मुंबईतील कूपर रुग्णालयात दाखल केलं. जिथे मुलीवर उपचार सुरू होते. दोन दिवसांनी चिमकल्या मुलीचा मृत्यू झाला आहे. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, मुलांच्या निष्काळजीपणामुळे मुलीचा मृत्यू झाला आहे. त्यानंतर भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६ अंतर्गत जुहू पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भरधाव पिकअपची धडक, ट्यूशनला निघालेली श्रेया जागेवरच गतप्राण!

छत्रपती सभाजीनगरच्या वैजापूर शहरात भरधाव पिकअपने दिलेल्या धडकेत एक १५ वर्षीय मुलीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास स्टेशन रोडवरील म्हसोबा चौक परिसरात घडली. ही घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झाली आहे. श्रेया हरिश्चंद्र दुसाने (वय १५ वर्षे, राहणारआनंदनगर) असे घटनेतील मयत मुलीचे नाव आहे. या घटनेबाबत स्थानिकांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार श्रेया ही सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास आनंदनगर येथून शिवप्रतापनगर येथे ट्युशनसाठी जात असताना म्हसोबा चौक परिसरात रास्ता ओलांडत असताना भरधाव पिकअपने तिच्या सायकलला धडक दिली. या अपघातात ती गंभीर जखमी झाली. तिला उपस्थित नागरिकांनी तातडीने वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकारी यांनी तिला तपासून मृत घोषित केले.

## बॉक्स ऑफिसची क्वीन आहे, एकमेव भारतीय अभिनेत्री; केलीय १०,००० कोटींची कमाई

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** बॉलिवूडमधल्या सुपरडुपर कमाई करणाऱ्या अभिनेत्यांबाबत तुम्ही ऐकलं असेलच. पण, बॉलिवूडची अशी एक अभिनेत्री आहे, जिनं कमाईच्या बाबत भल्या भल्या अभिनेत्यांनाही मागे टाकलं आहे. जिनं कमाईच्या बाबतीत मोठ्या दिग्गजांनाही पराभूत केलं आहे. सलमान, आमिर आणि शाहरुख खान या बॉलिवूडच्या तीन खान्सलाही तिनं अगदी सहज मागे टाकलं आहे. गेल्या काही दिवसांपासून अल्लू अर्जुनचा पुष्पा २ बॉक्स ऑफिस गाजवतोय, पण या अभिनेत्रीसमोर तोदेखील पाणी कम चाय आहे, असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. भल्या भल्या दिग्गज स्टार्सना पछाडणाऱ्या अन् एकापेक्षा एक असे हिट चित्रपट देणाऱ्या बॉक्स ऑफिस क्वीनला तुम्ही ओळखता का?

भारतातील सर्वात महागडी अभिनेत्री, बॉक्स ऑफिसवर कोणी आसपासही नाही...

एखादा सिनेमा हिट झाला की, नाही, हे कशावरुन समजतं, तर बॉक्स ऑफिसच्या आकड्यांवरुन. मग त्याची कथा कितीही चांगली असो किंवा गाणी धमाकेदार असो, तो चित्रपट बॉक्स ऑफिसवर किती चालतोय, किती रुपयांची कमाई करतोय यावरच तो चित्रपट यशस्वी ठरला की, नाही हे ठरतं. एखाद्या अभिनेत्याचा किंवा अभिनेत्रीचा चित्रपट किती चालणार? यावरुन त्या अभिनेत्याची किंवा अभिनेत्रीची किंमत ठरते. त्याच मेट्रिकनुसार, खान हे बॉलिवूडच्या इतिहासातील सर्वात यशस्वी सेलिब्रिटी आहेत. पण, या तिघांनाही पछाडणारी एक सौंदर्यवती आहे, जिनं बॉक्स ऑफिसवर थोडे थोडके नाहीतर तब्बल १० हजार कोटी कमावले आहेत.

शाहरुख, सलमान आणि आमिर खाननं त्यांच्या करिअरमध्ये बॉक्स ऑफिसवर ७००० कोटींहून अधिक कमाई केली आहे. आणि तरीही, १०,००० कोटींचा टप्पा मोडण्यात यशस्वी झालेल्या अभिनेत्रीला ते पछाडू शकले नाहीत. भल्या भल्या दिग्गजांना मागे टाकत बॉक्स ऑफिसवर राज्य करणारी दिग्गज अभिनेत्री म्हणजे, बॉलिवूडची मस्तानी दीपिका पादुकोण. गेल्या दशकात, ती भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात यशस्वी आणि सर्वाधिक कमाई करणारी अभिनेत्री म्हणून ओळखली जाऊ लागली. अनेक भाषांमध्ये हिट चित्रपट देऊन या अभिनेत्रीनं सर्वात मोठ्या स्टार्समध्ये आपलं स्थान पक्कं केलं.

१८ वर्षाच्या कारकिर्दीत, दीपिकाच्या चित्रपटांनी जागतिक बॉक्स ऑफिसवर एकत्रितपणे १०,२०० कोटी रुपयांची कमाई केली. यामध्ये तिच्या भारतीय चित्रपटांमधून ८००० कोटी आणि तिचा एकमेव हॉलिवूडपट ददद मधील २२०० कोटी कलेक्शनचा समावेश आहे. दीपिकाचे अनेक हिट चित्रपट बड्या स्टार्ससोबत आहेत, पण तिनं स्वत:च्या हिमतीवर 'पद्मावत'सारखा हिट चित्रपट दिला आहे.

विशेष म्हणजे, दोन वर्षापूर्वीपर्यत दीपिका भारतातील सर्वाधिक कमाई करणारी अभिनेत्री नव्हती. ती टॉप ५ मध्येही नव्हती. २०२३ आणि २०२४ मध्ये काही मेगा रिलीजनंतर आज ती सिनेइंडस्ट्रीमधील टॉपची अभिनेत्री बनली आहे.

'या' चार चित्रपटांनी विक्रम रचले

या दोन वर्षात दीपिका पाच चित्रपटांमध्ये दिसली आहे. त्यापैकी पठाण, जवान आणि कल्की या तिघांनी १००० कोटींहून अधिक कमाई केली. फायटर आणि सिंघम अगेन या उर्वरित दोन चित्रपटांनीही ३०० कोटींहून अधिक कमाई केली. अशा प्रकारे, दीपिका या दोन वर्षात तिच्या बॉक्स ऑफिस कमाईत ४००० कोटींहून अधिकची भर घालण्यात यशस्वी ठरली.

कतरिना, प्रियांकाही खूप मागे

दीपिकाला बॉक्स ऑफिसची क्विन म्हणू शकता. दीपिका भारतातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या अभिनेत्रींच्या यादीत पहिल्या स्थानी आहे. तर, बॉलिवूडची देसी गर्ल प्रियांका चोप्रा (६००० कोटी) आणि कतरिना कैफ (५५०० कोटी) यांनाही दीपिकानं मागे टाकलं आहे.

सलमान, शाहरुख आणि आमिरही मागे

फक्त अभिनेत्रीच नाही, तर अभिनेत्यांनाही दीपिकानं मागे टाकलं आहे, शाहरुख खान (९००० कोटी), अक्षय कुमार (८३०० कोटी), सलमान खान (७५०० कोटी), आणि आमिर खान (७२०० कोटी) हे सर्व दीपिकाच्या मागे आहेत.

दोन मोठे चित्रपट

दीपिकाकडे सध्या कल्की २ आणि ब्रह्मास्त्र २ हे प्रोजेक्ट्स आहेत. शंभर कोटी कमावण्याची क्षमता असलेले हे दोन मेगा चित्रपट आहेत.

## महत्त्वाचे...

### भरदिवसा घरात घुसले, वृद्धेसह मोलकरणीचे हातपाय बांधले अन्..., मुंबईतील घटनेनं खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** मुंबईतील विले पार्ले परिसरात एक खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. इथे भर दिवसा घरात घुसलेल्या दोन तरुणांनी ८५ वर्षाच्या वृद्ध महिलेसह मोलकरणीचे हातपाय बांधून घर रिकामं केलं आहे. आरोपींनी तब्बल साडेआठ लाखांचा ऐवज लुटला आहे. या प्रकरणी विलेपार्ले पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. या घटनेला तीन दिवस उलटून गेले आहेत. तरीही आरोपींबाबत अजूनही काहीच थांगपत्ता लागला नाही. पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित घटना विले पार्ले येथील तेजपाल स्कीम परिसरातील समर्थ निवास इमारतीत घडली आहे. या इमारतीच्या तळमजल्यावर ६० वर्षी दत्ताराम डिचोलकर आपल्या आई राधाबाई यांच्या समवेत वास्तव्याला आहेत. त्यांनी आपल्या वयस्कर आईची काळजी घेण्यासाठी संगीता यांना कामावर ठेवलं आहे. घटनेच्या दिवशी रविवारी काही वैयक्तिक कामानिमित्त दत्ताराम घराबाहेर गेले होते.

दरम्यान, दुपारी साडेबाराच्या आसपास दोन तरुण दत्ताराम यांच्या घरात घुसले. यावेळी घरात ८५ वर्षाच्या राधाबाई आणि मदतनीस संगिता घरात होत्या. आरोपींनी घरात घुसताच दोघींना चाकुचा धाक दाखवला आणि त्यांचे हातपाय बांधले. तोंडाला चिकटपट्टी लावली. यानंतर आरोपींनी घरातील सोन्या चांदीच्या दागिण्यांसह तब्बल साठे आठ लाखांचा ऐवज लुटून नेला.

दुपारी अडीच वाजता दत्ताराम जेव्हा घरी परतले, तेव्हा घराचं दार उघडंच होतं. त्यांनी आतमध्ये जाऊन पाहताच त्यांच्या आई आणि मदतनीस दोघी हातपाय बांधलेल्या अवस्थेत पडल्या होत्या. दत्ताराम यांनी सर्वप्रथम दोघींची सुटका केली. यानंतर घडलेला प्रकार समजल्यानंतर दत्ताराम यांनी विलेपार्ले पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पण आरोपींचा अजून काहीच थांगपत्ता लागला नाही. पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

### यशची चाहत्यांना वाढदिवसानिमित्त भेट, 'टॉक्सिक'चा टीझर रिलीज




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** साऊथचा सुपरस्टार यश आज ८ जानेवारीला आपला ३९वा वाढदिवस साजरा करत आहे. नवीन कुमार गौर उर्फ रॉकिंग स्टार यशच्या चाहत्यांसाठी आजचा दिवस खूप खास आहे. यश गेल्या १७ वर्षापासून भारतीय चित्रपटसृष्टीत काम करत आहे. त्यानं बॉक्स ऑफिसवर अनेक हिट चित्रपट दिली आहेत. त्याच्या हिट चित्रपटांमध्ये 'केजीएफ' हा अनेकांना पसंत पडला होता. २०१८ साली प्रदर्शित झालेल्या 'केजीएफ चॅप्टर १' चित्रपटामुळे त्याला जगभरात ओळख मिळाली. 'केजीएफ'पूर्वी यशनं अनेक चित्रपट हिट दिले आहेत, मात्र ते फक्त कन्नड चित्रपटसृष्टीपर्यंत मर्यादित होते. सध्या यशचा आगामी चित्रपट 'टॉक्सिक'च्या रिलीजची अनेकजण प्रतीक्षा करत आहेत.

'टॉक्सिक'चा टीझर रिलीज : यशनं त्याच्या वाढदिवसानिमित्त चाहत्यांना एक सुंदर भेट दिली आहे. त्यानं त्याचा आगामी चित्रपट 'टॉक्सिक'चा टीझर रिलीज केला आहे. यशनं ६ जानेवारी रोजी ॲक्शन ॲडव्हेंचर 'टॉक्सिक'चे पोस्टर शेअर केले होते. या पोस्टमध्ये त्यानं सांगितलं होतं की, तो त्याच्या ३९व्या वाढदिवसाला चाहत्यांना सरप्राईज गिफ्ट देईल. रिलीज झालेल्या टीझरमध्ये यशचा फर्स्ट लूक दाखविण्यात आला आहे. याशिवाय तो कारमधून उतरल्यावर एका नाईट कल्बमध्ये जाताना दिसत आहे. यानंतर तो एका पोल गर्ल डान्सरबरोबर काही रोमांटिक क्षण घालवत आहे. हा टीझर पाहून अनेकजण प्रभावित झाले आहेत. टीझरमध्ये यशनं क्रीम कलरच्या पोशाखावर टोपी घातलेली आहे. या लूकमध्ये तो एखाद्या माचो मॅनसारखा दिसत आहे. 'टॉक्सिक: ए डार्क फेयरीटेल'चं दिग्दर्शन गीतू मोनदास हे करत आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर १० एप्रिल रोजी रिलीज होणार आहे. आता यशचा हा पॅन इंडिया चित्रपट रुपेरी पडद्यावर धमाल करण्यासाठी सज्ज आहे. यश ३ वर्षापूर्वी 'केजीएफ २' या चित्रपटामध्ये दिसला होता. यानंतर तो एकाही चित्रपटामध्ये झळकला नाही. आता या चित्रपटामधून यश पुन्हा एकदा चाहत्यांचे मनं जिंकण्यासाठी येत आहे.

### दर्ग्यावर चादर चढवून घरी परतताना तीन तरुणांचा अपघाती मृत्यू

**पालघर/प्रतिनिधी :** राजस्थानमध्ये अजमेर येथील बाबाच्या दर्ग्यावर चादर चढवून घरी परतत असताना तीन तरुणांचा अपघाती मृत्यू झाला आणि चार तरुण गंभीर जखमी झाले. सर्व तरुण पालघर जिल्ह्यातील रहिवासी होते. अपघातात कारचा चेंदामेंदा झाला. दर्ग्यावर चादर चढवल्यानंतर तरुण कारने घरी परतत होते. त्यांच्या कारचा गुजरातमध्ये भरुच येथील अंकलेश्वरमध्ये बाकरोल पुलाजवळ बुधवारी पहाटे दोनच्या सुमारास अपघात झाला. वेगाने येणारी आर्टिगा कार ट्रकमध्ये घुसली. या अपघातात आयान बाबा चोगले (रा. मनोर), ताहीर नासिर शेख (रा. पालघर) आणि मुदस्सर अन्सार पटेल (रा. टाकवहाल) या तीन जणांचा अपघातात मृत्यू झाला. सलमान अल्ताफ शेख, शाहरुख सलीम शेख, शादाब मलिक शेख आणि मोईन सलीम शेख सर्व (रा. काटाळे) हे गंभीर जखमी झाले. जखमींवर भरुचमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# महाराष्ट्रात स्वतंत्र आयुष मंत्रालय निर्माण करावे!

## शासकीय कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मच्याऱ्यांना मोफत आयुर्वेद उपचार मिळावा!

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र आयुष मंत्रालय आणि विदयापीठ निर्माण करावे तसेच इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातील शासकीय कर्मच्या-यांना आणि सेवानिवृत्त कर्मचा-यांना लोपॅथी सोबतच आयुर्वेदिक उपचारही मोफत मिळावा असा प्रस्ताव केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडला आहे.

केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव हे ८ जानेवारीला मुंबई दौ-यावर असतांना त्यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीमध्ये दोन्ही नेत्यांनी विविध विषयांवर चर्चा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये आयुष मंत्रालयाची स्थापना करुन देशात आयुर्वेद उपचार पध्दतीला नविन दालन उपलब्ध करुन दिले आहे.

### केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी मांडला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव

देशातील नागरिकांचे आरोग्य निरोगी राहण्याच्या दृष्टीकोनातुन हर घर आयुर्वेद उपक्रमाअंतर्गत केंद्र सरकारच्या वतीने विविध उपक्रम आणि उपचार पध्दती संदर्भाची माहीती नागरीकांपर्यंत पोहचविण्याचे काम करण्यात येत आहे. आयुर्वेदीक उपचार पध्दतीला देशातील नागरीकांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये आयुर्वेदाला प्रोत्साहन देण्यासाठी नविन स्वतंत्र मंत्रालयाची आणि आयुष विद्यापीठाची निर्मीती करण्यात यावी या संदर्भांचा प्रस्ताव त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडला.

आयुष मंत्रालयाच्या माध्यमातुन सार्वजनिक आरोग्य, संशोधन, तंत्रज्ञान, शिक्षण, जागतिकीकरण आणि गुणवत्ता वाढीसाठी भरीव काम करण्यात येत आहे. देशाअंतर्गत आयुर्वेद उपचार पध्दतीचा स्विकार नागरीक करु लागले आहे. महाराष्ट्रातील लोकही प्राचीन आयुर्वेद उपचार पध्दतीचा अवलंब करत असल्याने आयुर्वेदाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातुन स्वतंत्र आयुष मंत्रालय किंवा आयुष विभाग स्थापन करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले. शासकीय कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मच्या-यांना राज्यस्थान दिल्ली व अन्य राज्यामध्ये मधुमेह, मूळव्याध, त्वचारोग, व इतर आजारांवर लोपॅथीसोबतच आयुर्वेद उपचार मोफत मिळतो. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील शासकीय कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मच्या-यांना मोफत आयुर्वेद उपचार मिळावा असा प्रस्तावही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी मांडला. या प्रस्तावा संदर्भात मुख्यमंत्री आणि केंद्रीय आयुषमंत्री यांच्या विचारविमश होवुन लवकरच योग्य निर्णय घेण्याचे आश्र्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांना दिले. यावेळी आमदार संजय कुटेही उपस्थित होते



# शेतकरी बांधवानी योजनाचा लाभ घ्यावा

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेंतर्गत मागेल त्याला सौर कृषि पंप योजना शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत आहे. या योजनेचा शेतकरी बांधवानी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

योजनेची वैशिष्टे : शेतकऱ्यांना सिंचनासाठी हक्काची स्वतंत्र आणि शाश्वत योजना, सर्वसाधारण गटाच्या शेतकऱ्यांसाठी केवळ १० टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स व कृषी पंपाचा पूर्ण संच, अनुसूचित जाती - जमातींच्या शेतकऱ्यांसाठी लाभार्थी हिस्सा ५ टक्के, उर्वरित रक्कम केंद्र आणि राज्य सरकारकडून अनुदान. जमिनीच्या क्षेत्रानुसार ३ ते ७.५ एचपीचे पंप, पाच वर्षांची दुरुस्ती हमी, इन्शुरन्स सह वीजबिल नाही, लोडशेडिंगची चिंता नाही, सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा होईल.



लाभार्थी निवडीचे निकष : २.५ एकरापर्यंत शेतजमीन धारक शेतकऱ्यास ३ अश्वशक्ती क्षमते पर्यंतचे सौर कृषीपंप, २.५१ ते ५ एकरापर्यंत शेतजमीन धारक शेतकऱ्यास ५ अश्वशक्ती क्षमतेचा आणि ५ एकरावरील शेतजमीन धारक शेतकऱ्यास ७.५ अश्वशक्ती क्षमतेचा सौर कृषीपंप देय राहील. तसेच पात्र क्षमतेपेक्षा कमी क्षमतेच्या सौर कृषीपंपाचे मागणी केल्यास तो अनुज्ञेय राहील. वैयक्तिक किंवा सामुदायिक शेततळे, विहिर, बोअरवेल यांचे मालक तसेच बारमाही वाहणारी नदी/नाले यांच्या शेजारील शेतजमीनधारक शेतकरी सुध्दा या योजनेसाठी पात्र राहतील. ज्या शेतकऱ्यांकडे बोअरवेल, विहिर व नदी इ. ठिकाणी शाश्वत पाण्याचा स्त्रोत आहे याची खात्री महावितरणद्वारे करण्यात येईल. तथापि, जलसंधारण कामाच्या पाणी जिरविण्याच्या पाणीसाठ्यामधून पाणी उपसण्यासाठी सदर पंप वापरता येणार नाहीत. तसेच अटल सौर कृषी पंप योजना-१, अटल सौर कृषी पंप योजना-२ व मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना या योजनांचा लाभ न घेतलेले लाभार्थी शेतकरी देखील या अभियानांतर्गत लाभास पात्र असतील.

# बायकोसोबत भांडण, मध्यस्थीसाठी पोलीस पाटील आला, नवऱ्याने कुऱ्हाडीचा घाव घातला!

दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** भांडणात मध्यस्थी करायला गेलेल्या पोलीस पाटलावरतीच कुऱ्हाडीने हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गोंदियाच्या सालेकसा पोलीस स्टेशन हद्दीतील फुक्कीमेटा येथे ही घटना घडली आहे. भांडणात मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या पोलिस पाटलाला एका व्यक्तीने डोक्यावर कुऱ्हाडीने वार करून जखमी केले. त्याचबरोबर त्याच्या हातातून कुऱ्हाड हिसकावल्याने त्याने दुसऱ्याच्या पोटावर देखील चावा घेतला. गोंदियाच्या सालेकसा पोलिस ठाण्यांतर्गत ग्राम फुक्कीमेटा येथे ही घटना घडली.

तेजराम येरपुडे (५६) असे आरोपीचे नाव आहे. आरोपी हा पत्नी इंदू येरपुडे हिच्यासोबत भांडण करीत असल्याने इंदूने फिर्यादी पोलिस पाटील यांना बोलवले होते. पोलीस पाटील समजूत काढण्यासाठी घरी गेले. मात्र, तेथे गेल्यावर आरोपी तेजराम याने 'तू नेहमी माझ्या घरगुती भांडणात मध्ये पडतो. यामुळे पहिले तुलाच मारतो', असे म्हणत फिर्यादी चंद्रकुमार यांच्या डोक्यावर उजव्या बाजूला कुऱ्हाडीने वार केला.




यामध्ये चंद्रकुमार यांच्या डोक्याला गंभीर जखम होऊन रक्तस्त्राव होऊ लागला. एवढ्यात आरोपी तेजराम दुसरा वार करण्याच्या बेतात असताना डॉ. राजकुमार हत्तीमारे यांनी त्याच्या हातातून कुऱ्हाड हिसकावून घेतली. यावर आरोपी डॉ. हत्तीमारे यांच्या पोटावर उजव्या बाजूला चावा घेऊन पळ काढला. पोलिसांनी भान्यासं २०२३ कलम १०९ (१), ११८ (१), १२१ (२) १३२ अंतर्गत गुन्हा नोंद केला आहे.

## बॉलिवूड क्वीन कंगना राणौतनं प्रियांका गांधींना 'इमर्जन्सी' चित्रपट पाहण्यासाठी दिलं आमंत्रण...

**मुंबई /प्रतिनिधी :** अभिनेत्री कंगना राणौतचा 'इमर्जन्सी' चित्रपट १७ जानेवारी रोजी रुपेरी पडद्यावर प्रदर्शित होत आहे. हा चित्रपट पाहण्यासाठी अनेकजण आतुर आहेत. देशात आणीबाणी लागू करणाऱ्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर आधारित 'इमर्जन्सी' चित्रपट आहे. या चित्रपटामध्ये कंगनानं माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे. दरम्यान अलीकडेच काँग्रेस खासदार प्रियांका गांधी वाड्रा यांना कंगनानं तिचा आगामी चित्रपट 'इमर्जन्सी' पाहण्यासाठी आमंत्रित केलं आहे. कंगनानं संसदेत त्यांच्या सहकारी खासदारांशी संवाद साधताना निमंत्रण दिलं. तसेच अलीकडेच तिनं संसद भवनात प्रियांका वाड्रा यांची भेट घेतली होती. भेटीदरम्यान कंगनानं प्रियांका यांना सांगितलं की, ''तुम्ही 'इमर्जन्सी' चित्रपट पाहायला पाहिजे.'' यावर प्रियांका यांनी खूप सुंदर पद्धतीनं उत्तर दिलं, ''हो, कदाचित.'' यानंतर कंगनानं म्हटलं, ''तुम्हाला नक्की आवडेल.'' कंगना राणौत स्टारर 'इमर्जन्सी' हा चित्रपट अखेर प्रदर्शित होत आहे. 'इमर्जन्सी' चित्रपटामध्ये १९७५मध्ये भारतात आणीबाणी लादलेली वेळ दाखविण्यात आली आहे.

## जयचंद बाठिया बाळशास्त्री जांभेकर पत्रकार भूषण जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मानित



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** दरवर्षी खामगाव प्रेस क्लबच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रात दिल्या जाणारा बाळ शास्त्री जांभेकर पत्रकार भूषण पत्रकार जिल्हास्तरीय पुरस्कार यावर्षी मेहकर येथील पत्रकार जयचंद बाठीया यांना प्रदान करण्यात आला आहे. प्रेस क्लब खामगाव च्या वतीने दरवर्षी पत्रकारीतेसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती दिनी ६ जानेवारी रोजी करण्यात येते.

यावर्षी खामगाव येथील कोल्हटकर स्मारक मंदिर या ठिकाणी पत्रकार दिनी ६ जानेवारीला संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी खामगाव येथील सामाजिक कार्यकर्ते छगनलाल खंडेलवाल होते. प्रमुख अतिथी म्हणून ना.आकाशदादा फुंडकर, डॉक्टर पालवे अमोल अंधारे डॉक्टर कवीश्वर,प्रमोदबापू देशमुख आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवर तथा प्रेस क्लब खामगाव चे अध्यक्ष प्रशांत देशमुख त्यांचे सहकारी हस्ते शाल श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन जयचंद बाठीया यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाला जयचंद बाठीया यांचे सोबत मेहकर येथील पत्रकार सिद्धेश्वर पवार, ज्ञानदेव मानवतकर,रफिक कुरेशी,जुगराज पठ्ठे, भरत सारडा,संतोष मलोसे,गजानन देशमुख, मनीष मांडवगडे ज्ञानेश्र्वर इंगळे, विशू दळवी युनूस भगवान,संतोष गाडेकर, गणेश राऊत सह समाधान सास्ते,गजानन चांगाडे,नितीन निकम,संतोष पवार, उल्हास कनकेकर,संतोष नवले,गोलू नवले आदी मित्र परिवार उपस्थित होता

# टी.बी.मुक्त अभियाना संदर्भात केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी.नडा यांच्या अध्यक्षतेखाली आणि आयुष, आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** टी.बी.या संसर्गजन्य रोगाला देशातुन हदपार करण्याच्या दृष्टीकोनातुन भारत सरकारच्या वतीने टी.बी. मुक्त भारत अभियान संपुर्ण देशात राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या अमंलबजावणी संदर्भात दिल्ली येथे आज महत्वपुर्ण बैठक झाली असुन या बैठकीत १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.






पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात आरोग्य सेवा सर्वसामान्य लोकांना सुलभ आणि सहज उपलब्ध करण्याच्या दृष्टीकोनातुन केंद्रीय आरोग्य विभागामार्फत विविध योजना देशपातळीवर राबविण्यात येत आहे. टी.बी. या संसर्गजन्य आजारापासुन रुग्णांना मुक्त करण्यासाठी येणा-या काळात देशात टी.बी.मुक्त भारत अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियाना संदर्भात आज ६ जानेवारीला दिल्ली येथे अंतर मंत्रालयीन बैठक केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी नडा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय, केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एच.डी.कुमारस्वामी, केंद्रीय मंत्री आरोग्य राज्यमंत्री श्रीमती अनुप्रिया पटेल उपस्थित होते. या बैठकी दरम्यान टी.बी.मुक्त भारताला करण्याच्या दृष्टीकोनातुन करावयाच्या उपाययोजना आणि १०० दिवसांचे कृती आराखडा संदर्भात सांगोपांग चर्चा करण्यात आली. या बैठकीला आरोग्य विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त 'जिजाऊ गाथा महोत्सव'; महोत्सवाचा लाभ घ्यावा- जिल्हाधिकारी यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सांस्कृतिक कार्य विभागामार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, व नगरपालिका प्रशासन यांच्या सहकार्याने राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवनिमित्त जिजाऊ गाथा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव श्री. लखुजीराजे जाधव राजवाडा(राजमाता जिजाऊ जन्मस्थळ) परिसर, सिंदखेड राजा येथे दि.१० व ११ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपासून सुरु होणार असून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचा जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

शुक्रवार दि. १० जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी व १०० कलाकारांचा समूहाव्दारे 'जिजाऊ वंदना महाराष्ट्राची लोकधारा' सांस्कृतिक कार्यक्रम. दि. ११ जानेवारी रोजी महाराष्ट्राचे प्रसिद्ध गायक नंदेश उमप यांचा कार्यक्रम होणार आहे.

### साईचरणी लीन झालेल्या प्रिया दत्त आई-वडिलांच्या आठवणीनं भावूक, राजकारणाबाबत म्हणाल्या, पूर्वीच्या..."

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** ''राजकारणात मोठे बदल झाले आहेत. आता दृष्टीकोन बदलला आहे. पूर्वीच्या राजकारणात एकमेकांबद्दल आदर आणि सन्मान होता. मात्र, अलीकडच्या राजकारण हे दिसून येत नाही. प्रथम देश आणि त्यानंतर पक्ष अशी सकारात्मक भूमिका राजकीय नेत्यांची असणं महत्वाचं आहे'', प्रिया दत्त यांनी साई दर्शनानंतर माध्यमांशी बोलतांना म्हटलय.

माजी खासदार प्रिया दत्त यांनी आज शिर्डीत येवून साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतलं आहे. साई दर्शनानंतर माध्यमांशी बोलताना प्रिया दत्त यांचे डोळे पाणावले. यावर बोलताना प्रिया दत्त यांनी म्हटलं, ''माझी आई (अभिनेत्री नर्गीस दत्त) साईबाबांची परमभक्त होती. ती आजारी असतानाही शिर्डीला येत असत. आज शिर्डीत येवून साईंच दर्शन घेतल्यानंतर त्यांच्या आठवणी जाग्या झाल्या आहेत. आम्ही जीवनात अनेक चढ-उतार बघितले. मात्र, आपल्यात ती ताकद पाहीजे. साईंचा आशिर्वाद असला तर नक्कीच चांगलं होते. साईंकडे मी तेच मागितलं आहे''.

अभिनेता संजय दत्तबरोबर दोन्ही बहिणी येणार दर्शनाला- ''साईबाबांच्या दर्शनासाठी आल्यानंतर मी प्रत्येकवेळी काहीच मागत नाही. जीवनात अनेक चढ-उतार येतात. या अडचणींचा सामना करण्याची शक्ती साईबाबांकडून मिळावी, एवढीच प्रार्थना साईचरणी केली आहे'', असे प्रिया दत्त यांनी म्हटलंय. पुढे प्रिया यांनी म्हटले, '' साईबाबांचे दर्शन घेवून मंदिराबाहेर आल्यानंतर भाऊ संजय दत्त आणि आम्ही दोघी बहिणींनी एकत्रित साईंच्या दर्शनासाठी यावे, असा विचार आला. साईबाबांचे बोलवणं आले तर लवकरच आम्ही तिघे भाऊ-बहीण एकत्र साईबाबांच्या दर्शनासाठी येणार आहोत''.

### गौतम गंभीरने मुंबईच्या खेळाडूवर केला अन्याय? द्विशतक ठोकल्यानंतरही दोन महिने 'वॉटर बॉय' म्हणून राबवले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** एका दशकाच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर अखेर कांगारूंनी बॉर्डर गावसकर ट्रॉफी २०२४-२५ वर कब्जा केला. कसोटी मालिकेत ३-१ असा पराभव पत्करावा लागल्यानंतर टीम इंडियावर जोरदार टीका होत आहे. कर्णधार रोहित शर्मा आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यावरही प्रश्नचिन्ह आहेत. संपूर्ण मालिकेत भारतीय संघाचे प्लेईंग इलेव्हन बदलत राहिले, पण एक खेळाडू असा होता जो ५ सामन्यात फक्त पाणी देत होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे २०२४ मध्ये अनेक स्टार खेळाडू कसोटीत संघर्ष करताना दिसले असताना या खेळाडूने वर्षभर धावा केल्या. तो दुसरा तिसरा कोणी नसून सरफराज खान आहे. ज्याला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेत टीम इंडियात स्थान मिळाले होते, पण एकाही कसोटीत त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळाले नाही. आश्चर्याची बाब म्हणजे संघ व्यवस्थापनाने देवदत्त पडिक्कल आणि ध्रुव जुरेल यांच्यावर विश्वास व्यक्त केला, मात्र सतत धावा करत असतानाही सरफराजकडे दुर्लक्ष करण्यात आले.

सरफराजकडे दुर्लक्ष

सरफराज खान फॉर्मात नव्हता असे नाही. न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत उर्वरित भारतीय फलंदाज शरणागती पत्करत असताना, सरफराजने बंगळुरूमध्ये शानदार शतक झळकावले. यापूर्वी इराणी चषक २०२४ मध्ये मुंबईकडून खेळताना त्याने द्विशतकही झळकावले होते. २०२४ मध्ये सरफराज देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगला खेळला होता आणि त्यामुळेच त्याला टीम इंडियामध्ये स्थान मिळाले. मात्र, ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर त्याच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले.

संजय मांजरेकर यांनी उपस्थित केला प्रश्न

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत सरफराज खानकडे दुर्लक्ष केल्याबद्दल माजी भारतीय क्रिकेटपटू संजय मांजरेकर यांनी टीम इंडिया व्यवस्थापनावर प्रश्न उपस्थित केले आहेत. ईएसपीएन क्रिकइन्फोवर आपले मत देताना तो म्हणाला की, सरफराज खानला देशांतर्गत क्रिकेटमधील उत्कृष्ट कामगिरीचे बक्षीस मिळाले. त्याने भारतासाठी ३ अर्धशतके आणि १५० धावांची खेळी खेळली. पुढच्या काही सामन्यांमध्ये तो नक्कीच फ्लॉप झाला, पण ऑस्ट्रेलिया मालिकेत त्याच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले, जे योग्य नाही.